# किरकोळ केरोसीन परवाना देण्या बाबत कार्यपध्दती

1.रिक्त असलेल्या गावाचे जाहीरनामा काढुन शासन निर्णय दिनांक 3 नोव्हेंबर-2007 अन्वये मुदे नमुद करुन महीला बचत गटाचे अर्ज स्वीकारणे तालुकास्तरावर

2. सदर अर्जाचे मुल्य 100/- रुपये तालुकास्तरावर भरणा करुन अर्ज उपलब्ध्द करुन घेणे.

3. सदर जाहीरनाम्यामध्ये नमुद केलेले खालील प्रमाणे कागदपत्रे मागविण्यात येतात

   1 विहीत नमुन्यातील अर्ज

   2 स्वंय सहाय्यता बचत गट नोंदणी प्रमाण पत्र

   3 **स्वंय सहाय्यता गटाचे आर्थीक स्थीतीबाबत कागदपत्र जसे बॅक पासबुक व बॅकेचे प्रमाणपत्र**

   4. व्यवसाय करावयाच्या जागेचे मालकी बाबत कागदपत्र, जागा भाडयाची असल्यास भाडेपत्र घ्र टॅक्स पावती 7/12 जागेचे क्षेत्रफळ व्यवसाय ठिकाणाचे क्षेत्रफळ चौ. फुटमध्ये

   5. बॅंकेकडुन घेतलेल्या कर्जाचे व परतफेडेचे प्रमाणपत्र (बॅंकेचे)

   6. स्वंय सहाय्यता गटाने घेतलेले कर्ज व झालेली परतफेड विवरण

   7. **स्वंय सहाय्यता गटातील अध्यक्ष/उपाध्यक्ष/सचिव व सर्व सभासदांची नावे संपुर्ण पत्यासह**

   8. स्वंय सहाय्यता गटाचे मुळ व आजचे भाग भांडवल व सध्या करीता असलेला व्यवसाय व कार्याची संपुर्ण माहिती

   9. किरकोळ केरोसीन परवाना/रास्त भाव धान्य दुकान मिळण्या बाबत व व्यवसाय करण्या बाबत संमती दर्शविलेलया गटाचा ठराव.

   10. परवाना स्वंय सहाय्यता गट स्वत: एकत्रित रित्या चालविल आणि कोणत्याही इतर व्यक्तीस वा संस्थेला चालविण्यास देणार नाही किंवा हस्तांरित करणार नाही याबाबत सर्व सदस्याचे एकत्रित प्रतिज्ञापत्र

4. जाहीरनाम्यात नमुद केलेल्या अटीनुसार महीला बचत गटाचे अर्ज तालुकास्तरावरुन विहीत कालावधीत प्राप्त झालेले अर्ज संकलीत करुन त्या बाबत विवरण तयार करणे.

5. सदर गावातील आलेल्या अर्जाची छाननी समितीचे बैठक शासन निर्णनयानुसार लाऊन बचत गटाची निवड करणे.

6. सदर बचत गटाची निवड केल्यानंतर सदर निवड केलेल्या बचत गटाचे नांव त्या गावचे ग्राम पंचायकडे /नगर परिष् देकडे ग्राम सभेचा ठरावा करीता पाठविणे.

7. सदर ग्राम पंचायत /नगर परिष्दे कडुन ग्रामसभेचा ठरावा तुसार शीफारस केली असल्यास त्याचे गावचे आदेश तयार करुन निर्गमित करणे.

8. सदर आदेश संबंधीत बचत गटाला निवड झाल्या बाबत व तहसिलला पुढील परवान्याच्या कार्यवाही करीता निर्गमित करणे.

9. शासन निर्णय क्रमांक: साविव्य-1005/प्र.क2075/नापु-28 मंत्रालय विस्तार मुंबई 32 दिनांक 3 नोव्हेंबर 2007 मधील क्रमांक 4 नुसार संबंधीताकडुन परवाना शुल्लक व 50 टक्के अनामत रक्कम भरणा करुन घेण्यात येणे.

10.सदर बचत गटाकडुन परवाना अनामत रक्कम व परवाना रक्कम चलानव्दारे शासकीय खजीण्यात भरणा करुन व जागेचे कागद पत्र व भरणा करण्यात आलेल्या चलान प्रत प्राप्त झाल्यावर परवाना निर्गमित करणे.